**ठळक बातम्या**

- गणेश चतुर्थी निमित्त सर्वत्र उत्साहाचं वातावरण, घरोघरी गणरायाच्या आगमनाचा आनंद

- मॉर्गन स्टॅनले कॅपिटल इंटरनॅशनलच्या उद्योन्मुख बाजार गुंतवणूक निर्देशांकातल्या मूल्यांकनात भारताची चीनवर आघाडी

- उत्तर प्रदेशात बस अपघातात १२ जणांचा मृत्यू, १६ जखमी, केंद्र आणि राज्य सरकारकडून आर्थिक मदत जाहीर

**आणि**

- पॅरालिम्पिक मध्ये होकातो होतोझे सेमा याला कांस्यपदक

<><><><><>

१४ विद्या आणि ६४ कलांचा अधिपती असणाऱ्या विघ्नहर्त्या गणपती बाप्पाचं आगमन भाद्रपद शुक्ल चतुर्थीच्या आजच्या दिवशी घरोघरी आणि सार्वजनिक मंडपांमध्ये मोठ्या उत्साहात झालं. महाराष्ट्राचं वैशिष्ट्य असलेला हा अनोखा उत्सव अनुभवण्यासाठी अनेक परदेशी पर्यटकांचं आगमनही मुंबई - पुण्यात झालं आहे. दहा दिवस चालणाऱ्या या उत्सव काळात राज्यात सुमारे ११ हजार कोटी रुपयांहून अधिक व्यापार होण्याची शक्यता व्यापारी संघटनांनी व्यक्त केली आहे. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू आणि प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी देशवासियांना गणेश चतुर्थीनिमत्त शुभेच्छा दिल्या आहेत.

गणपती बाप्पा मोरयाच्या जयघोषात आज मुंबईत सव्वा दोन लाख घरगुती आणि सुमारे 12 हजार सार्वजनिक मूर्तींची मोठ्या भक्तीभावाने प्रतिष्ठापना झाली.

पूजा साहित्य, वस्त्रालंकार तसंच मिठाईच्या दुकानांमध्ये मोठी उलाढाल पाहायला मिळते.

राज्यपाल सी पी राधाकृष्णन यांच्या हस्ते राजभवन इथे गणरायाची प्रतिष्ठापना झाली. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या वर्षा बंगल्यावर बाप्पाच्या मूर्तीची विधिवत प्रतिष्ठापना झाली. श्री गणरायाचं आगमन आनंदाचं, समृद्धीचं पर्व घेऊन येवो, अशी सदिच्छा मुख्यमंत्र्यांनी व्यक्त केली आहे. गणेशाची मनोभावे सेवा करतानाच सामाजिक बांधिलकीची जाणीव ठेवण्याचं आवाहन त्यांनी केलं आहे. तसंच पर्यावरणाची योग्य काळजी घेऊन सणवार साजरे केले जावेत, असं आवाहनही त्यांनी केलं आहे. यंदा राज्यात चांगला पाऊस झाला आहे. त्यामुळे शेतकरी बांधवांमध्ये उत्साह आहे. काही ठिकाणी अतिवृष्टीमुळे शेतीभातीचं नुकसान झालं आहे, पण सरकार पूर्णपणे शेतकऱ्यांच्या पाठीशी आहे, असं मुख्यमंत्री म्हणाले. उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या निवासस्थानीही आज गणरायाची विधिवत प्रतिष्ठापना झाली.

**<><><><><>**

MSCI अर्थात मॉर्गन स्टॅनले कॅपिटल इंटरनॅशनलच्या EMIM अर्थात उद्योन्मुख बाजार गुंतवणूक निर्देशांकातल्या मूल्यांकनात भारतानं चीनला मागे टाकलं आहे. या निर्देशांकात भारताला २२ पूर्णांक २७ शतांश टक्के मूल्य मिळाले आहे, तर चीनची हिस्सेदारी २१ पूर्णांक ५८ शतांश टक्के आहे. गेल्या काही काळात भारतातल्या विविध शेअर बाजारात मोठी तेजी दिसून आली आहे. त्याचवेळी चीनमधले बाजार काहीशा बिकट अवस्थेत आहेत. या निर्देशांकात समावेश झाल्यानं भारतीय बाजारपेठेत ४ ते साडे ४ अब्ज डॉलरची गुंतवणूक

येण्याची शक्यता आहे. या निर्देशांकातल्या समावेशाविषयी बाजार विश्लेषक चंद्रशेखर टिळक यांनी आकाशवाणीशी बोलताना सांगितलं…

**होल्ड - चंद्रशेखर टिळक**

**<><><><><>**

उत्तर प्रदेशातल्या हाथरस इथं काल झालेल्या बस अपघातात बारा जणांचा मृत्यू झाला आहे, यात चार बालकांचा समावेश आहे. यात १६ जण जखमी झाले आहेत. जखमींवर जिल्हा रुग्णालयात उपचार सुरू आहेत. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू आणि प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी अपघाती मृत्यूबद्दल दुःख व्यक्त केलं आहे. मृतांच्या नातेवाईकांना प्रधानमंत्री मदत निधीतून दोन लाख रुपयांची तर जखमींना ५० हजार रुपये मदतीची घोषणा प्रधानमंत्र्यांनी समाजमाध्यमाद्वारे केली आहे. उत्तरप्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांनीही मृतांच्या नातेवाईकांना दोन लाख आणि जखमींना ५० हजार रुपयांची मदत जाहीर केली आहे.

**<><><><><>**

मणिपूरमध्ये आज सकाळपासून झालेल्या हिंसाचाराच्या घटनांमध्ये ६ जणांचा मृत्यू झाला असून अनेकजण जखमी झाले आहेत. जरिबाम जिल्ह्यात एका व्यक्तीला, तो घराबाहेर झोपला असता गोळी घालण्यात आली. नंगचेपी भागात दोन गटात झालेल्या हिंसाचारात तीन दहशतवाद्यांसह चार जणांचा मृत्यू झाला. तांगजेंग खुजाओ भागात दोन जण जखमी झाले. मोयरांग शहरात झालेल्या एका गावठी बॉम्बच्या स्फोटात एकाचा मृत्यू झाला असून इतर पाच जण जखमी झाले. काल रात्री विविध ठिकाणी तैनात असलेल्या मणिपूर रायफल्सच्या तुकड्यांना जमावांनी घेराव घालून त्यांच्याकडील शस्त्रे आणि दारुगोळा लुटण्याचा प्रयत्न केला.

**<><><><><>**

शिक्षणामुळे समाजात बदल घडून येत असून वाईट प्रवृत्ती नष्ट होतात. असं उपराष्ट्रपती जगदीप धनखड यांनी म्हटलं आहे. ते आज गोरखपूर इथं सैनिकी शाळेच्या उद्घघाटन समारंभात बोलत होते. आपण स्वतः चित्तोडगड़ सैनिक शाळेचा विद्यार्थी होतो त्यामुळे सैनिकी शाळेच्या उद्घघाटनला उपस्थित राहिल्याबद्दल त्यांनी आनंद व्यक्त केला.

**<><><><><>**

जम्मू आणि काश्मीर विधानसभा निवडणुकीसाठीच्या नामांकनाच्या दुसऱ्या फेरीत २६७ उमेदवारी अर्ज पात्र ठरले, तर ६२ अर्ज फेटाळण्यात आले. ही छाननी प्रक्रिया काल झाली. केंद्रशासित प्रदेशातल्या २६ विधानसभा मतदारसंघातून ३२९ नामांकन अर्ज दाखल करण्यात आले होते. उमेदवारी अर्ज सोमवारपर्यंत मागे घेता येणार असून दुसऱ्या फेरीसाठी २५ सप्टेंबरला मतदान होणार असल्याचं आकाशवाणीच्या वार्ताहरानं कळवलं आहे.

**<><><><><>**

पश्चिम बंगालचे राज्यपाल सी व्ही आनंद बोस यांनी बहुचर्चित अपराजिता महिला आणि बाल विधेयक, त्यात अनेक त्रुटी असल्याचं नमूद करत, राष्ट्रपतींकडे पाठवलं आहे. हे विधेयक घाईघाईत तयार केलं असून त्यासोबत त्यात तांत्रिक अहवाल जोडला नसल्याचं त्यांनी समाज माध्यमांवरच्या पोस्टमध्ये म्हटलं आहे. यासाठी त्यांनी राज्य सचिवालयाला जबाबदार धरलं आहे.

**<><><><><>**

आयआयटी मुंबईला गेल्या आर्थिक वर्षात संशोधन आणि विकासासाठी ७०० कोटी रुपयांचा निधी मिळाला आहे. गेल्या तीन वर्षातील हा सर्वाधिक निधी असून त्यात खाजगी संस्थांकडून मिळालेल्या निधीचे प्रमाण ३५ टक्के आहे. उर्वरित

निधी हा सरकारी संस्थांकडून मिळालेला आहे. देशाला तंत्रज्ञान आणि आत्मनिर्भर करण्यासाठी आयआयटी मुंबई कटीबद्ध असल्याचं आयआयटीनं म्हटलं आहे.

<><><><><>

अग्नि ४ या मध्यम पल्ल्याच्या बॅलिस्टिक क्षेपणास्त्राचं ओदिशातल्या चंदीपूर इथल्या एकात्मिक चाचणी केंद्रावरून काल यशस्वी प्रक्षेपण करण्यात आलं. या प्रक्षेपणामुळे क्षेपणास्त्राच्या सर्व तांत्रिक बाबींची यशस्वी पडताळणी झाल्याचं संरक्षण मंत्रालयानं म्हटलं आहे. हे प्रक्षेपण स्ट्रॅटेजिक फोर्स कमांडच्या नेतृत्वाखाली करण्यात आलं. देशाची संरक्षण क्षमता बळकट करण्यात हे प्रक्षेपण मैलाचा दगड ठरणार असल्याचं संरक्षण मंत्रालयानं म्हटलं आहे.

<><><><><>

पॅरालिम्पिक मध्ये पुरुषांच्या क्लब थ्रो अर्थात लाठीफेकीत होकातो होतोझे सेमा याने कांस्य पदक जिंकल्याबद्दल राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू आणि प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी त्याचं अभिनंदन केलं आहे. एका भुसुरुंग स्फोटातून बचावलेल्या सेमा यानं आपल्या पॅरालिम्पिक स्पर्धेतल्या आपल्या पदार्पणातच पदक जिंकल्याचा राष्ट्रपतींनी आवर्जून उल्लेख केला. तसंच त्याच्या उज्ज्वल भविष्याबद्दल शुभेच्छा दिल्या. तर हा देशासाठी अभिमानास्पद क्षण असल्याचं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी म्हटलं आहे.

दरम्यान, पॅरीस पॅरालिम्पिकमध्ये भारतानं आतापर्यंत २७ पदकं जिंकली आहेत. यात ६ सुवर्ण, ९ रौप्य आणि १२ कांस्य पदकांचा समावेश आहे. भारताच्या पॅरालिम्पिकच्या इतिहासातली ही सर्वोत्तम कामगिरी आहे. आतापर्यंत उंच उडीमध्ये प्रवीण कुमार, नेमबाजीत अवनी लखेरा, भालाफेकीत सुमित अंतिल, तिरंदाज हरविंदर सिंग, बॅडमिंटनपटू नितेश कुमार आणि क्लब थ्रोवर धरमबीर नईन

यांनी पदकावर आपलं नाव कोरलं आहे. सुवर्ण पदक विजेते तिरंदाज हरविंदर सिंग आणि धावपटू प्रीती पाल यांनी या एकाच पॅरालिम्पिकमध्ये दोन पदकं जिंकणाऱ्या पहिल्या महिला ठरल्या आहेत. या दोघी रविवारी होणाऱ्या समारोप समारोहात ध्वजवहन करणार आहेत.

**<><><><>**

मध्य आणि दक्षिण गाझा पट्टीत इस्त्रायलने केलेल्या बॉम्ब हल्ल्यात जवळपास दहा पॅलेस्टिनी नागरिक मारले गेल्याची माहिती पॅलेस्टाईनमधल्या सूत्रांनी दिली आहे. मध्य खान यूनिस शहरातल्या कंदील कुटुंबाच्या घरावर इस्त्रायली लष्कराने केलेल्या हल्ल्यात पाच जण ठार झाले तर काही जण जखमी झाले. तसंच मध्य गाझातल्या नुसेरत निर्वासित छावणीतल्या शेहदा कुटुंबाच्या घरावर केलेल्या हल्ल्यात पाच जण मृत्यूमुखी पडले. घरांच्या ढिगाऱ्याखाली अनेक लोक अडकल्याची शक्यता गाझाच्या आरोग्य विभागानं वर्तवली आहे. याआधी मागच्या शुक्रवारी इस्त्रायलनं केलेल्या हवाई हल्ल्यात १८ पॅलेस्टिनी मारले गेल्याचं गाझातल्या वैद्यकीय विभागानं सांगितलं आहे.

**//<><><><>//**